नि.फौ.ख.क्र.१९/२०१८.
सरकार वि. मधुकर व इतर
नि.क्र.२७

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.<u>०५</u> यांची जबानी**
**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**माझे नाव : नरेंद्र शामराव तायडे,**
**वय : ३९ वर्षे, व्यवसाय : सहायक पोलीस निरीक्षक,**
**नेमणुक : सदर पोलीस स्टेशन, नागपूर**

**सरतपासणी–सहा.सरकारी अभियोक्ता श्री. डी.आय.बारस्कर यांच्यामार्फत शपथेवर सूरुः–**

**०१.** दिनांक २७.०९.२०१७ रोजी मी एमआयडीसी बोरी पोलीस स्टेशन येथे पोलीस उपनिरीक्षक या पदावर कार्यरत होतो. फिर्यादी आकाष जैयस्वाल याने आमच्या पोलीस स्टेशनला तक्रार दिली. त्यानुसार अपराध क्रमांक ३५६/२०१७ नोंदविण्यात आला. त्यानंतर सदर अपराधाची केसडायरी माइ–याकडे तपासाकरीता सोपविण्यात आली होती. तपासकामी माइ–याकडे एफआयआर व रिपोट असे कागद देण्यात आले होते.

**०२.** त्यानंतर मी घटनास्थळावर गेलो. घटनास्थळ हे ईशान कास्टींग प्रा. लि. कंपनी, एमआयडीसी बोरी येथे होते. तेथे मी दोन पंचासमक्ष पंचनामा तयार केला. सदर पंचनामा मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला नि.क्र.१८ वरील पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यानंतर मी आरोपींना अटक केली व त्यांच्या अटकेचे पंचनामे तयार केले. सदर पंचनामे मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला एकुण पाच अटक पंचनामे दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यावर माझी, आरोपींची व पंचांच्या सहया आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर पंचनाम्यांना अनुक्रमे **<u>नि.क्र. २८ ते ३२</u>** देण्यात आले.

**०३.** त्यानंतर आरोपी क्र. २ मोहम्मद शकील याने आमच्या ताब्यात असतांना गुन्हयाची कबुली दिली की, ईशान कास्टींग कंपनी प्रा. लि. या कंपनीमध्ये येणा–या लोखंडी स्क्रॅबच्या टिप्परवर तो चालक होता व त्याने व आरोपी क्र.१ ने कंपनीमध्ये लोखंडी स्क्रॅब आणतांना त्यामधील ५ टन लोखंडी स्क्रॅब हे कंपनीमध्ये न आणता आरोपी क्र.५ च्या कबाडी दुकानामध्ये डोंगरगाव, तालुका–हिंगणा, जिल्हा–नागपुर येथे परस्पर विक्री केला आहे, त्यावेळेस आम्हाला आरोपी क्र. ३ व ४ यांनी आम्हाला मदत केली होती. सदर कबुली निवेदन नोंदवुन घेतले. सदर कबुली जवाब मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला एक कबूली जवाब दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी, आरोपी क्र.२ ची व दोन

पंचांच्या सहया आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.३३</u>** देण्यात आले. तसेच तेव्हा आरोपी क्र.१ मधुकर गोहते याने सुध्दा आमच्या ताब्यात असतांना गुन्हयाची कबुली दिली की, ईशान कास्टींग कंपनी प्रा. लि. या कंपनीमध्ये सेकयूरीटी गाडी असतांना त्याने व आरोपी क्र.२ ने कंपनीमध्ये लोखंडी स्क्रॅब आणतांना त्यामधील ५ टन लोखंडी स्क्रॅब हे कंपनीमध्ये न आणता आरोपी क्र.५ च्या कबाडी दुकानामध्ये डोंगरगाव, तालुका–हिंगणा, जिल्हा–नागपुर येथे परस्पर विक्री केला आहे, त्यावेळेस आम्हाला आरोपी क्र. ३ व ४ यांनी आम्हाला मदत केली होती. सदर कबुली निवेदन नोंदवुन घेतले. सदर कबुली जवाब मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला एक कबूली जवाब दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी, आरोपी क्र.१ ची व दोन पंचांच्या सहया आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र. ३४</u>** देण्यात आले. त्यानंतर आम्ही  आम्ही डोंगरगाव येथील आरोपी क्र.५ च्या कबाडी दुकानामध्ये गेलो असता, तेथे आम्हाला पाच टन एंन्गलचे लोखंडी तुकडे/स्क्रॅब मिळुन आले. सदर लोखंडी तुकडे पंचासमक्ष जप्त करुन त्याचा जप्ती पंचनामा तयार केला. सदर पंचनामा मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला सदरचा दाखविण्यात आला. तो तोच आहे. सदर जप्ती पंचनाम्याला **नि.क्र.३५** देण्यात आले.

**०४.** त्यानंतर मी साक्षीदारांचे जवाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले. त्यानंतर मी आरोपींविरुध्द सबळ पूरावा मिळुन आल्यामूळे सदरचा अंतिम अहवाल दाखल केला. माझ्या तपासामध्ये असे निष्पन्न झाले की, आरोपी क्र. १ ते ४ यांनी संगनमताने ईशान कास्टींग कंपनी प्रा. लि. या कंपनीचा स्क्रॅब परस्पर अपहार करुन आरोपी क्र.५ ला विक्री केला व आरोपी क्र.५ ने त्याची जाणीव असतांना सदर स्क्रॅब विकत घेतला. मी आरोपींना ओळखू शकतो. आरोपी क्र. १ ते ३ आज न्यायालयात हजर आहे. आरोपी क्र.४ न्यायालयात हजर नाही. (*आरोपी क्र.४ ची आजची गैरहजेरी ओळखीचा वाद उपस्थीत न करण्याच्या अटीवर नि.क्र. २६ वरील आदेशाप्रमाणे आजच्या पूरती माफ करण्यात आली आहे.*)

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. यु. सी. घांगरेकर यांचे मार्फत सूरुः–</u>**

**०५.** आरोपी क्र.१ व २ हे ईशान कास्टींग कंपनी प्रा. लि. या कंपनीमध्ये काम करीत असल्याबाबत मी कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही.  हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ व २ यांनी कधीही मला कबुली जवाब दिला नाही.   हे म्हणणे खरे नाही की, मी पंचांना पंच म्हणुन हजर राहण्यासाठी लेखी समंस दिले नाही.  हे म्हणणे खरे नाही की, मी कधीच घटनास्थळ वर जावून पंचासमक्ष कधीच घटनास्थळ पंचनामा तयार केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचांना पोलीस स्टेशन येथे बोलवून तेथेच त्यांच्या सहया घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे बयान त्यांच्या म्हणण्याप्रमाणे कधीच

नोंदविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी सदरच्या प्रकरणात योग्य तो तपास न करता आरोपी विरोधात खोटे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले व आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास संपला. फेर तपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.क. केले. माझे समक्ष,

VISHAL HARIBHAU KHEDKAR

Digitally signed by VISHAL HARIBHAU KHEDKAR
Date: 2026.04.02 16:46:39 +0530

हिंगणा. (व्ही.एच.खेडकर)

दि.०२.०४.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, हिंगणा.